महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152
ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897
3. The Maharashtra Essential Service Maintenance (Amendment) Act, 2011
3. The Mumbai Nursing Homes Registration (Amendment) Act, 2006
4. भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188
4. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

---------------------------------------------0000---------------------------------------------

क्र दंडप्र-01/कावि/2020/ २७१

दिनांक ०४ जून, 2020

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार भारतात , महाराष्ट्रात व जळगांव जिल्हयात देखील गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयातील कोव्हिड-19 विषाणुमुळे बाधित व्यक्तींची वाढत असलेली संख्या लक्षात घेता व जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथे उपलब्ध असलेली आयसीयु बेडची क्षमता अपुरी पडण्याची शक्यता असल्याने खाजगी हॉस्पिटल व हॉस्पिटलचे अधिनस्त असलेले मनुष्यबळ, हॉस्पिटल मधील सर्व साधन सामग्री, ॲम्ब्युलन्स अधिग्रहीत करणे आवश्यक आहे, असे माझे मत झालेले आहे.

त्याअर्थी, **मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 65 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग व कोव्हिड-19 विषाणूमुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या उपचाराकरीता आपत्कालीन व्यवस्था म्हणून "**गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव** " हे हॉस्पिटल अत्यावश्यक बाब म्हणून **Dedicated Covid Hospital म्हणून घोषित करीत असून सदर हॉस्पिटलचे पहिल्या मजल्यावरील 10 ICU बेड्स सहीत एकूण 50 बेड्स व सदर हॉस्पिटलचा सर्व मेडीकल / पॅरामेडीकल स्टाफ सह सर्व सुविधा दिनांक 05 जून, 2020 पासून पुढील आदेश होई पावेतो अधिग्रहीत करीत आहे.**"

Scanned with CamScanner

गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव यांचे परिचालन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव यांचे मार्फत करण्यात येईल. तसेच अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगांव यांनी त्यांचे स्तरावरुन सदर हॉस्पिटलशी समन्वय ठेवण्याकामी एक डॉक्टरांची नियुक्ती करावी.

गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव यांनी आदेशाच्या दिनांकापासून हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलेले सर्व रुग्णांना आवश्यकते प्रमाणे डिस्चार्ज करावे व जेथे शक्य आहे अशा रुग्णांच्या बाबतीत त्यांना अन्य हॉस्पिटल मध्ये भरती करण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर हॉस्पिटल मध्ये आदेशाच्या दिनांकापासून केवळ कोव्हिड-19 विषाणूमुळे बाधित / संशयीत रुग्ण दाखल करण्यात येतील, या व्यतीरीक्त अन्य कोणत्याही रुग्णास हॉस्पिटल मध्ये दाखल करुन घेता येणार नाही. गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव यांनी प्रशासनाकडून वेळोवेळी निर्गमीत करण्यात येणाऱ्या सूचना, निर्देश, आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**सदर आदेशाचे उल्लंघन अथवा भंग केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897, भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक 04/06/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

स्वाक्षरीत/-
**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
2. पोलीस अधिक्षक, जळगांव
3. उपविभागीय दंडाधिकारी, जळगांव भाग, जळगांव
4. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
5. व्यवस्थापक, गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव
6. अध्यक्ष, इंडियन मेडीकल असोसिएशन, जळगांव

**प्रत :-** अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
2/- सदर रुग्णालयात भरती / उपचार केलेल्या सर्व रुग्णांचे अभिलेख ठेवावेत. महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी स्वतंत्र खात्यात ठेवून तो गोल्ड सिटी हॉस्पिटल, जळगांव यांचे बँक खात्यावर कोणतीही तूट न लावता तात्काळ अदा करणे आवश्यक राहील.

**प्रत :-** डॉ गोपाळ जोशी, जिल्हा समन्वयक, राज्य आरोग्य हमी सोसायटी, जळगांव यांनी गोल्ड सिटी हॉस्पिटल जळगांवची महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत तात्काळ नोंदणी करावी व सदर योजनेतील लाभ संबंधित हॉस्पिटल येथे लागू करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**प्रत :-** जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांनी सदरील आदेशाचे सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

Scanned with CamScanner